



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com


आकर्षक व दर्जेदार स्कीमसह

युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..




संपर्क :- 9129582958

पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा


वर्ष २ रे | अंक : ६३८ वा | मंगळवार | दि. २६ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# भ्रष्टाचारी डॉ. वासेकरांवर प्रशासकीय कारवाईला वेग येणार का?

## जिल्हा रुग्णालयातील इतर भ्रष्टाचाऱ्यांचाही बंदोबस्त व्हावा

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन वासेकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच स्वीकारताना रंगेहात पकडल्यानंतर त्यांचा सध्या कोठडीतील मुक्काम वाढला आहे. खरे तर डॉ. वासेकर यांचे लाच प्रकरण हे साधेसुधे लाचप्रकरण नाही. यामागे जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार, अत्यंत अनागोंदी कारभार देखील कारणीभूत आहे. खरेतर आता या प्रकरणी सरकारी सेवेच्या नियमांप्रमाणे डॉ. वासेकर यांचे तात्काळ निलंबन होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणा काय काम करते, याकडे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. बुलढाण्याचे जिल्हा सामान्य रुग्णालय असो की येथील जिल्हा स्त्री रुग्णालय. या दोन्ही ठिकाणी अनागोंदी कारभार आहे हे अगदी स्पष्टच आहे. आतापर्यंत जिल्हा स्त्री रुग्णालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला नव्हता, परंतु दोन दिवसांपूर्वी घडलेल्या एका घटनेने हे स्पष्ट झाले. जिल्हा स्त्री रुग्णालयात केवळ गर्भाशयाला टाके मारण्यासाठी आलेल्या एका गरोदर महिलेच्या चुकीच्या ट्रीटमेंटमुळे चक्क त्या महिलेचा गर्भपात झाला. हे सर्व काही होण्याचे कारण म्हणजे जिल्ह्याच्या आरोग्य विभागात काही निर्ढावलेले आणि मस्तवाल झालेले डॉक्टर आणि अधिकारी. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या

**पोस्टमार्टम ५८**

डॉक्टरांकडून प्रस्थापित वैद्यकीय अधिकारी आणि जुने डॉक्टर मोठ्या प्रमाणात काम करवून घेतात. त्या बदल्यात या कंत्राटी डॉक्टरांकडून बऱ्याचदा विविध गोष्टींची मागणी देखील होती. सचिन वासेकर यांच्या लाच प्रकरणामुळे ही लपूनछपून चालणारी घटना स्पष्टपणे अधोरेखित झाली. एका कंत्राटी डॉक्टरकडून लाच स्वीकारताना डॉ. सचिन वासेकर हे अलगदपणे एसीबीच्या जाळ्यात अडकले. या घटनेमुळे जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार व अनागोंदीला यामुळे अगदी सुस्पष्ट वाचा फुटली. सध्या वासेकर हे पोलिस कोठडीत आहेत. त्यांना कोठडीत ४८ तासांपेक्षा जास्त वेळ झाल्यामुळे खरेतर प्रशासकीय नियमाप्रमाणे तात्काळ त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होणे अपेक्षित आहे. परंतु आरोग्य विभागात बोकाळलेला एकंदर भ्रष्टाचार पाहता, वासेकरांवर ही कारवाई होणार का, यावर एक भलंमोठं प्रश्नचिन्ह आज उभं आहे. ही कारवाई झाली नाही तर मात्र आरोग्य विभाग हा भ्रष्टाचारात आकंठ बुडालेला आहे, हे स्पष्टपणे समोर येईल. त्यामुळे जर आरोग्य विभागाला आपल्यावरील भ्रष्टाचाराचा शिक्का पुसायचा असेल, तर आरोग्य उपसंचालक किंवा त्यावरील अधिकाऱ्यांनी तात्काळ वासेकरांवर निलंबनाची कारवाई करणे अपेक्षित आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या या भ्रष्टाचारावर सातत्याने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी सविस्तर वृत्तमालिका देखील प्रकाशित करण्यात येत आहे. आजवर या भ्रष्टाचाराविरोधात वृत्तमालिका प्रकाशित करण्याचे धाडस कोणताही मीडिया करू शकलेला नाही. ते धाडस दाखवण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने केलेले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारामागे कोणाकोणाचे हात आहेत, याबाबत अनेकदा स्पष्टपणे अनेकदा सांकेतिक पद्धतीने अंगुलीनिर्देश करीत आहे. मात्र, कुंभकर्णी झोपेत असलेला आरोग्य विभाग, आरोग्य उपसंचालक कार्यालय अजूनही जागे होण्यास तयार नाही. डॉ. वासेकरांच्या लाच प्रकरणामुळे एकीकडे आरोग्य खात्यात प्रचंड खळबळ उडाली आहे. डॉ. वासेकर तर लाच घेताना रंगेहात टिपले गेले, परंतु जे वैद्यकीय

**अरे बावा तुला पगार ही कमी पडत होत का ?**



अधिकारी आणि प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक राहिलेल्या अधिकाऱ्यांचा नंबर कधी लागणार, असा प्रश्न आज अनेक जण विचारू लागले आहेत. कारण जिल्हा रुग्णालयातील या भ्रष्टाचाचा फटका वर्षानुवर्षांपासून सामान्य व गोरगरीब नागरिकांना बसत आहे. डॉ. वासेकर वासेकर एसीबीच्या जाळ्यात अडकल्यामुळे अनेकांनी संतुष्टी व्यक्ती केली असून, वासेकरांप्रमाणेच इतरांना देखील भ्रष्टाचार प्रकरणी पकडले जावे, अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली आहे.

उर्वरित पान २ वर...

# अतीपावसाने आणि खराब हवामानामुळे भुमराळा येथील शेतकऱ्यांनी हरबऱ्याच्या शेतात फिरवला रोटर

**जनसंचलन/लोणार**

यावर्षी पहिलीच दुष्काळी परिस्थिती आणि कमी पावसाने खरीपातील सोयाबीन पीक अत्यंत कमी पिकले , आणि त्यानंतर शेतकऱ्यांनी उपलब्ध होती त्या ओलीवर हरभरा पिकाची पेरणी केली होती,पण अवेळी आलेल्या अतीपावसाने आणि ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांचे हरभरा पीक धोक्यात आले असून अळीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला,व जमीनीत जास्त ओलावा असल्याने हरभरा पिकांच्या मुळाशी बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव जास्त आढळून आल्याने शेतकऱ्यांना उभ्या हरभरा पिकावर रोटर फिरवावा लागल्याने या मोठा भुर्दंड सोसावा लागत आहे,तरी सरकारने हरभरा पीकालाही पीकविमा मंजूर करून शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा मोबदला द्यावा अशी मागणी भुमराळा येथील शेतकरी, ज्ञानेश्वर महादु मोरे, संजय रामकिशन मोरे, रामेश्वर शिवाजी मोरे, गजानन कैलास मोरे,राजकुमार दशरथ बोडखे दत्ता रावजी मोरे, रामभाऊ साहेबराव



टेकाळे,विजय प्रल्हाद टेकाळे, भगवान हरीभाऊ मोरे, ज्ञानेश्वर आनंदा हंबिले, अशोक हरिभाऊ मोरे, संदिप कैलास मोरे आणि भुमराळा येथील सरपंच, संतोष प्रल्हाद मोरे, गावकऱ्यांनी केली आहे.


बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....

निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर

पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा मो. 9923191666

* उपलब्ध सुविधा *

- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार

डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# पान १ वरून भ्रष्टाचारी डॉ. वासेकरांवर प्रशासकीय...

कोरोना महामारीच्या काळात भ्रष्टाचार करणाऱ्या त्रिकुटामधील एक डॉ. सचिन वासेकर होते. या त्रिकुटातील पाटीलकी करणारा एक वैद्यकीय अधिकारी तसेच प्रभारी पदावर राहून स्वतःच्या पोत्यात भुसा भरून घेणारा डॉक्टर अद्यापही मस्तवाल वळूप्रमाणे मोकाटपणे फिरत आहे. त्याच्यावरही कायद्याचा बडगा उगारला जावा, अशी अपेक्षा आरोग्य विभागातील अनेकजण व्यक्त करीत आहेत. याशिवाय या ठिकाणाहून भ्रष्टाचारातून स्वतःच्या तुंबड्या भरणारे पूर्वाश्रमीचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित असो की तडस किंवा भ्रष्टाचाराचे विक्रम प्रस्थापित करणारे माजी रोखपाल पी. के. माळी, विद्यमान रोखपाल लाकडे हे सर्व जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराचे आयकॉन बनलेले आहेत. जिल्हा रुग्णालयातील या सर्व भ्रष्टाचाऱ्यांची सखलो चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. असे झाल्यासच आगामी काळात सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा प्राप्त होऊ शकतील. अन्यथा जिल्हा रुग्णालयाच्या प्रशासनात लागलेली ही भ्रष्टाचाराची वाळवी एक दिवस संपूर्ण आरोग्य व्यवस्थेला आतून पोखरून-पोखरून खस्ताहाल करून टाकेल व आरोग्य सुविधा कोलमडण्यास वेळ लागणार नाही. ही सर्व परिस्थिती उद्याच्या पिढ्यांसमोर येऊ नये, यासाठीच दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने भ्रष्टाचारविरोधातील आपला लढा सुरू केला असून, या लढ्याला आता कुठे यश मिळताना दिसून येत आहे. त्यामुळे आता तरी आरोग्य विभागाने तत्परता दाखवून कारवाई करावी. ही कारवाई न झाल्यास आगामी काळात दैनिक जनसंचलन आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या विरोधात देखील आपली मोहीम उघडल्याशिवाय राहणार नाही.

जिल्हा सामान्य रुग्णालय करोडो रुपये भ्रष्टाचार अफरातफरी प्रकरणातील दोषींचा उलगडा पुढील प्रत्येक सत्रात..

# दे. राजा तालुक्यात चोरांचा सुळसुळाट घरात घुसून पैसा, सोन्यावर हाथ साफ...

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

मागील महिन्यात तालुक्यातील आळंद, भीवगाव, कुंभारी, शहरातील सीव्हील कॉलनी, चिखली रोड, आदर्श कॉलनी, सराफा बाजार या वस्तीत भुरट्या चोरांनी उच्छाद मांडला आहे. साखर झोपेत असलेल्या नागरिकांच्या घराचा कडीकोंयडा त्यांच्या खिशातील पाकिटा मधील पैसे, मोबाईल लंपास करण्यापर्यंत या भुरट्या चोरांची मजल गेली आहे. वाहन पार्क केलेल्या रहिवाशांच्या दुचाकीच्या डिक्की मधून देखील पैसे चोरीला जात असल्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. १८ डिसेंबर रोजी भर दुपारी तालुक्यातील भीवगाव व आळंद येथे लाखो रुपयांच्या चोरीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. घर बांधकाम, मुलांच्या लग्नासाठी, शिक्षणासाठी पैसा तसेच



आरोग्यसाठी जमा करण्यात आलेली पूंजी जमा करुन नागरिक घरात ठेवतात. परंतु होत असलेल्या चोऱ्यांमुळे पोलीस विभागाच्या ढसाळ कराभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तालुक्यात शहर परिसरात काही लुटमार करणाऱ्या टोळ्यांची आजही दहशत पहावयास मिळते. सध्या या टोळ्या शांत असल्या तरी त्यांची पिलावळ आणि हस्तक जोमात आहे. जुनी नगर परीषद मागे कालीका मंदीराजवळ १६ डिसेंबरच्या मध्यरात्री एकजण हातामधे काही घेऊन फिरत असता सीसीटीव्ही फुटेज मधे दिसत आहे. अनेक भरवस्तीतील परिसरात पहाटेच्या वेळेस हे टोळके खुलेआम फिरत असताना दिसत असते. त्यामुळे पोलिसांनी गस्त वाढवण्याची आणि अशा भुरट्या चोरांच्या मुस्क्या आवळण्याची गरज निर्माण झाली आहे. दहशतीमुळे नागरिक तक्रार करण्यास धजावत नाही एवढे मात्र खरे.

# कृष्णा सपकाळ झाले व्हॉईस ऑफ मिडीयाचे जिल्हा कार्याध्यक्ष गजानन धांडे सरचिटणीस तर निलेश जोशींवर चिटणीस पदाची जबाबदारी!

**जनसंचलन / चिखली**

व्हॉईस ऑफ मिडिया या भारतातील पत्रकारांची सर्वात मोठा संघटना असलेल्या संघटनेची जिल्हा बैठक आज,२४ डिसेंबरला बुलडाणा येथील पत्रकार भवनात झाली. राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, कोअर कमिटी सदस्य अरुण जैन, सिध्देश्वर पवार, जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत लाइव्ह ग्रुप चे समूह सल्लागार कृष्णा सपकाळ यांची व्हॉईस ऑफ मिडीयाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिला.





बुलडाणा येथील पत्रकार भवनात झालेल्या जिल्हा बैठकीला जिल्ह्यातील सर्वच तालुकाध्यक्ष उपस्थित होते. संघटनेच्या आतापर्यंतच्या कामकाजाचा आढावा घेत, आगामी कार्यक्रमाबाबत चिंतन यावेळी करण्यात आले. यावेळी संघटना वाढीच्या दृष्टीने नवीन नियुक्त्या करण्यात आल्या. यात जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून कृष्णा सपकाळ, जिल्हा सरचिटणीस म्हणून गजानन धांडे, चिटणीस म्हणून निलेश जोशी, जिल्हा संघटक रवींद्र पाटील कळसुंदर, प्रसिध्दी प्रमुख अण्णा वंत्रोले तर प्रवक्ता म्हणून आदेश कांडेलकर यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. साप्ताहिक विंगच्या विदर्भ कार्याध्यक्षपदी भाऊ भोजने यांची नियुक्ती करण्यात आली.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात ख्रिसमस दिन साजरा...







**जनसंचलन / बुलढाणा**

जिंगल बेल...जिंगल बेल..जिंगल ऑल द वे..फची धून गात शहरातील ख्रिश्चन बांधवांनी ख्रिसमस उत्साहात साजरा केला. ख्रिश्चन बांधवांना शुभेच्छा आणि भेटवस्तू देत हा पवित्र सण साजरा केला. बुलढाणा शहरातील द नॅझरिन ऑफ चर्च तहसील चौक बुलढाणा व मातृत्व नॅझरिन चर्च या ठिकाणी मोठ्या उत्साहात सण साजरा करण्यात आला आहे. द नॅझरिन ऑफ चर्च चे फादर श्री सुहास गुर्जर यांनी सांगितले, की येशू शांतीचा अधिपती होते. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी सर्व मानवजातीस शांती मिळावी, यासाठी बेथलेहेम गावी गायीच्या गोठ्यात येशूचा जन्म झाला. येशूची शिकवण ही सर्व मानवासाठी आहे. त्यांच्या शिकवणीनुसार आचरण केल्यास मनाला शांती मिळते. कुटुंब, समाज व राष्ट्रला शांतीची गरज आहे. येशूने जगात शांतता नांदावी, म्हणून या सृष्टीवर जन्म घेतला. ते शांतिदूत होते. मनुष्याला पापापासून मुक्त करण्यासाठी व जगाला प्रेम, दया, क्षमा व शांतीची शिकवण देण्यासाठी येशू या जगात आले होते. २० डिसेंबर पासुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. लहान मुलांची गीत गायन,तसेच विविध कार्यक्रम घेण्यात आले आहे.प्रत्येकांच्या घरी जाऊन प्रभुची गाथा सांगण्यात आले आहे. २४ डिसेंबर रात्री १२ वाजेच्या सुमारास केक कापुन प्रभुचा जन्म दिवस साजरा करण्यात आला.२५ डिसेंबर ला शहरातील दोन्ही चर्च मध्ये ख्रिस्ती समाज बांधव एकत्र येऊन प्रभुला प्रार्थना करुन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला द नॅझरिन ऑफ चर्च ला बुलढाणा विधान सभेचे आमदार संजय गायकवाड यांनी भेट दिली व ख्रिस्ती समाज बांधवांना ख्रिसमस दिनाच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या हस्ते केक कापण्यात आला आहे.

---

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर महिलांना सोडले वाऱ्यावर नातेवाईक संतप्त, स्थानिक डॉक्टर फरार...

## पर्यायी डॉक्टर दोन तासानंतर परतले पण दोनच तासात परत गेले

## डॉक्टरचा पेशंटच्या जीवाशी खेळ...

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

तालुक्यातील अंढेरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रकिया झाल्यानंतर आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर हजर नसल्याचा धक्कादायक प्रकार २४डिसेंबर रोजी रात्री घडला सदर प्रकाराबाबत महिलांच्या नातेवाईक तथा महिलांनी ओरड केल्यानंतर प्रसार माध्यम प्रतिनिधी यांनी भेट दिली असता तेथे कुठलेच जबाबदार आधिकारी उपस्थित नसल्याचे दिसून आले व त्यानंतर प्रसार माध्यम प्रतिनिधी यांनी येथे कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नसल्याने सदर प्रतिनिधी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अमोल गीते यांना सुद्धा भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला असता त्यांनी सुद्धा फोन न उचलण्यात धन्यता मानली. त्यानंतर सदर प्रतिनिधी यांनी या प्रकाराची आपबीती सांगण्यासाठी भ्रमणध्वनीवर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांना संपर्क साधला असता त्यांनी तातडीने सदर प्रकरणात लक्ष घालून निगरगट्ट झोपेचे सोंग घेतलेले व निरागस महिलांच्या जीवाशी खेळ सुरू असतांना त्यानी तातडीने संबंधित विभागाला अवश्य त्या उपाय योजना करण्याचे आदेश दिले त्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रसार माध्यम प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधून या प्रकाबाबत आपबीती सांगितली तर त्यातून सत्य बाहेर आले कार्यरत आरोग्य अधिकारी हे सुट्टीवर गेलेले आहेत असे त्यांनी सांगून त्यांची सुट्टी ही १७ डिसेंबर रोजी संपली असतांना ते हजर झाले नसल्याचे त्यांनी सांगितले त्यानंतर पर्यायी डॉक्टर शिवानंद शिंगाडे यांना पाठविण्यात आले मात्र ते सुद्दा रात्री आठ वाजता येऊन दहा वाजता परत गेल्याने महिला व नातेवाईक यांना मनस्ताप सहन करावा लागला तसेच या अगोदर जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील डोंणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुद्दा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ठेवण्यात आल्या त्या ठिकाणी २०महिला पात्र ठरल्या होत्या व सदर महिलांना वीस तास उपाशी पोटी ठेवून त्या ठिकाणी डॉक्टर आलेच नव्हते त्या नंतर सर्जरी साठी खाजगी डॉक्टर बोलावून सर्जरी करण्यात आली होती ही या घटनेची शाही वाळत नाही तर अंढेरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यानंतर डॉक्टर यांनी उपस्थित राहणे आवश्यक असतांना त्यानी त्याठिकाणी उपस्थित राहण्यास टाळाटाळ करणे हे रुग्णांच्या नातेवाईक मंडळी यांना मनस्ताप सहन करावा लागणारे ठरले असून तसेच सेवानगर येथे डेंगू सदृश रुग्ण आढळल्यानंतर आरोग्य यंत्रणा त्याठिकाणी सुद्दा संबंधित रुग्णांना



उपचार करून सुट्टी झाल्यानंतर प्रसार माध्यमातून त्या डेंगूसदृश्य रुग्णाच्या नातेवाईक यांनी आरोग्य विभागावर नाराजी व्यक्त केली व हे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर एक दिवस त्या ठिकाणी भेट देऊन अवघ्या काही वेळातच पथक परतले होते व त्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी जाण्यास पथकाला वेळ सुद्दा मिळाला नाही तसेच वातावरणात झालेल्या बदलाने अनेक गावखेड्यात रुग्ण संख्या वाढत असतांना आरोग्य विभाग याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत असून जबाबदार सुद्दा त्यांना पाठीशी घालत असल्याचे वास्तव दिसून येत असून या आरोग्य केंद्राच्या हद्दीतील उपकेंद्रांची सुद्दा ही अवस्था असतांना या ठिकाणी तेरी भी चूप मेरी भी चूप हा प्रकार सुरू आहे म्हटल्यास वावगे ठरू नये एवढे मात्र खरे अंढेरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रकार गंभीर असुन गैरहजर असणारे वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी यांच्या गंभीर स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल.

# माहूर गड येथील अधिवेशनात बहुसंख्येने सहभागी व्हावे - जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर

**जनसंचलन/चिखली**

मराठी पत्रकार परिषदेचे माहूर गड येथे १३ जानेवारी रोजी भव्य पत्रकाराचे अधिवेशन व आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा होत असून या सोहळ्यास जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी चिखली येथे केले. चिखली येथील कॉलेजमध्ये मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मिडिया परिषदेच्या चिखली व देऊळगाव राजा तालुका कार्यकारिणीची सभा २४ डिसेंबर रोजी पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी डिजिटल मिडीया परिषदेचे जिल्हाध्यक्ष अनिल उंबरकर होते.तर जिल्हा संघटक नारायण दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डिजिटल मिडिया परिषदेच्या चिखली व देऊळगाव राजा तालुका कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्यांना नियुक्ती पत्राचे वितरण करण्यात आले. प्रास्ताविकात चिखली तालुकाध्यक्ष सुनिल अंभोरे यांनी डिजिटल मिडिया परिषदेची ध्येय धोरणे समजावून सांगितली. यावेळी दे राजा तालुकाध्यक्ष राजेंद्र डोईफोडे,आदीसह पत्रकार बांधव उपस्थित होते. संचलन चिखली तालुका सचिव एकनाथ माळेकर यांनी केले. तर आभार चिखली तालुकाध्यक्ष सुनिल अंभोरे यांनी मानले.

# चिखली येथील रहिवाशी श्रीनिवास जाधव याची सायकलिंग प्रकारात नॅशनल रोड रेस साठी निवड

**जनसंचलन / चिखली**

चिखली येथील रहिवाशी व ग्रामीण पाणी पुरवठा विभागात कार्यरत असलेले अनंता जाधव यांच्या मुलाची निवड ही तालुक्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. महाराष्ट्र राज्य सायकलिंग असोशियन आयोजित चौथी महाराष्ट्र राज्य सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२३ ते २४ बारामती येथे पार पडली. त्यामध्ये रोड टाईम ट्रायल प्रकारात १४ वर्षा वयाच्या गटात श्रीनिवासने सिल्वर व मास स्टार्ट प्रकारात ब्रांच पदक पटकावले. आता त्याची निवड नॅशनल रोड रेस स्पर्धा विजापूर( कर्नाटक) येथे होणाऱ्या स्पर्धे साठी झाली आहे त्यात त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. श्रीनिवास महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग दि .वा .देवधर क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थी आहे व तो माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय महाळुंगे बालेवाडी पुणे येथे शिकत आहे तो आपल्या यशाचे श्रेय क्रीडा मार्गदर्शक दिपाली पाटील मॅडम यांना देतो व त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकत आहे त्यामुळे सर्व स्तरातून त्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे तो आपल्या येशाचे श्रेय आपले आई-वडील व आपले क्रीडाशिक्षक दिपाली मॅडम यांना देत आहे

# आता कोल्हेंनाही चॅलेंज अजित पवार शिरूरमध्ये आढळराव पाटलांना तिकीट देणार?

वृत्तसंस्था/पुणे

आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार उभा करू आणि विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांचा पराभव करू, असं ओपन चॅलेंज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं आहे. मागील विधानसभा निवडणुकीत शिवसेना नेते तथा माजी मंत्री विजय शिवतारे यांच्याविरोधातही असंच चॅलेंज देऊन अजित पवार यांनी शिवतारेंच्या पराभवात मोठा वाटा उचलला होता. त्यामुळे आता डॉ. कोल्हेंना चॅलेंज देऊन अजित पवार पुरंदरची पुनरावृत्ती शिरूरमध्ये करणार का? अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे अमोल कोल्हे यांच्या पराभवाचा प्रण बोलून दाखविताना अजित पवार यांनी मात्र राष्ट्रवादीकडून (अजित पवार गट) उमेदवार कोण असेल? याबद्दलचं सूतोवाच करणं खुबीने टाळलं. मी जे बोलतो ते करून दाखवतोच, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार उभा करून या निवडणुकीत आमचा उमेदवार आम्ही निवडून आणू आणि अमोल कोल्हे यांचा पराभव करू, असं खुलं आव्हान अजित पवार यांनी दिलं.अमोल कोल्हे यांना तिकीट नाकारण्यात आले होते. त्यांना तिकीट कोणामुळे मिळाले? हे त्यांना विचारा. तसेच निवडून आल्यानंतर दीड महिन्यामध्ये ते राजीनामा द्यायला निघाले होते. गेल्या पाच वर्षात ते मतदारसंघात दिसले नाही. त्यामुळे त्यांचेच मन त्यांना खायला लागले आहे. मात्र, शिरूर लोकसभेमध्ये महायुतीचा उमेदवार उभा करणार आणि तो निवडून आणणार. मी जे बोलतो ते करतोच, अमोल कोल्हे यांचा पराभव करणारचङ्खङ्ख, असा निर्धार अजित पवार यांनी बोलून दाखवला.भाजपकडून शिरूर लोकसभा मतदारसंघावर वारंवार दावा सांगितला जात असताना शिवसेना शिंदे गटाकडून कोणतीही हालचाल होत नसल्याने शिवसेना नेते तथा शिरूरचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील अस्वस्थ आहेत. त्यांच्या मनाची घालमेल होत असून जर लवकर निर्णय झाला नाही तर अजित पवार गटाकडून लोकसभा निवडणूक लढविण्याची त्यांची तयारी असल्याची माहिती मटा ला विश्वसनीय सूत्रांनी दिली. तसेच शिवसेना नेतृत्वाकडून लोकसभेचा पक्का शब्दही आढळराव पाटलांना मिळालेला नसल्याने ते राजकीय पर्याय चाचपून पाहू शकतात.



अजित पवार यांनी शिरूर लोकसभेवर ठासून दावा सांगितला आहे. आज तर त्यांनी खासदार कोल्हे यांचा जाहीरपणे पराभव करण्याचा प्रण बोलून दाखवला आहे. शिरूरमध्ये अमोल कोल्हे यांना टक्कर देणारा राष्ट्रवादीकडे सध्या तरी उमेदवार नाहीये. अशा परिस्थितीत शिवाजीराव आढळराव पाटील यांना आपल्याकडे खेचून ही लढत अधिक रंजक करण्याची, प्रसंगी ही जागा आपल्याकडे खेचण्याची अजितदादांची रणनीती असल्याचा कयास राजकीय जाणकार बोलून दाखवत आहेत.

## थर्टी फर्स्टसाठी पहाटे ५ पर्यंत हॉटेल सुरु ठेवू द्या, शिंदे सरकारकडे असोसिएशनची मागणी

वृत्तसंस्था/मुंबई



यंदा नाताळ व नववर्ष स्वागताचा उत्साह अधिक आहे. ही हॉटेल उद्योगाला नवसंजीवनी मिळण्यासाठी मोठी संधी आहे. त्यामुळे नाताळ व थर्टी फर्स्टसाठी पहाटे ५ वाजेपर्यंत परवानाकृत हॉटेल सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी,अशी मागणी हॉटेल व रेस्तरां असोसिएशन पश्चिम भारत (हरवी) यांनी राज्य सरकारकडे केली आहे. हरवी ही राज्यभरातील हॉटेल व्यावसायिकांची मोठी संघटना असून ७२ वर्षे जुनी आहे. असोसिएशनने कायम नियमांच्या अधीन राहून व कायदेशीर व्यवसायाला बळ दिले आहे. त्यामुळेच राज्य सरकारने केवळ परवानाधारक हॉटेल व रेस्तरां यांना अशी परवानगी द्यावी,फ असे असोसिएशनने म्हटले आहे.यासाठी त्यांनी राज्याचे प्रधान सचिव (गृह) राधिक रस्तोगी, पोलिस महासंचालक रजनीश सेठ व मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांना पत्र लिहिले. ङ्गनाताळ व नववर्षाच्या उत्साहाचे स्वागत करण्यासाठी सर्व हॉटेल व्यावसायिक सज्ज आहेत. आमच्या या ग्राहकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हॉटेल व्यवसाय पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी मिळावी. आमचे सर्व सदस्य उच्च दर्जाच्या सुरक्षेचे पालन करीत सेवा देतील,फ असे असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी सांगितले.असोसिएशनने २५ डिसेंबर व ३१ डिसेंबर रोजी अशा प्रकारे पहाटे ५ वाजेपर्यंत हॉटेल व रेस्तरां सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. राज्य सरकारने यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेतल्यास हॉटेल व रेस्तरां यांना ग्राहकांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी मुबलक वेळ मिळून चांगले नियोजन करता येईल, असेही शेट्टी यांचे म्हणणे आहे.हरवीमध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोव्यासह दादरा व नगर हवेली तसेच दीव-दमण या केंद्रशासित प्रदेशांतील हॉटेल व रेस्तरां संघटनेचे सदस्य आहेत. ही संघटना भारतीय हॉटेल व रेस्तरां महासंघाचा भाग आहे.




दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्यांना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day |
|---|---|---|---|
| 8x8 cm (Width 8 cm, Hight 8 cm) | 5000/- | 3500/- | 2000/- |
| 5x8 cm (Width 8 cm, Hight 5 cm) | 3500/- | 2200/- | 1500/- |
| 5x8 cm (Width 23 cm, Hight 5 cm) | 3500/- | 2200/- | 1500/- |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Size | Price |
|---|---|
| Width 12 cm, Hight 12 cm | 2600/- |
| Width 10 cm, Hight 8 cm | 1800/- |
| Width 8 cm, Hight 8 cm | 1300/- |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com